Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- XI NOVEMBER 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# भारतीय निवडणूक यंत्रणेतील दोष (विशेष संदर्भ : एक देश एक निवडणूक)

प्रा.डॉ. आर.बी. लक्षटे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर

निवडणूका लोकशाहीचा आत्मा आहे. निवडणूका शासनाची जन प्रतिची जबाबदारी निश्चित करणारी एक नियमित निश्चित व योग्य प्रणाली आहे. निवडणूक एक साधन आहे, देशात लोकशाही आणण्याचे निवडणूका आणि लोकशाही व राजकारण यांचा फार जवळचा संबध आहे. वेळेच्या आत पारदर्शकपणे व शांततेने होणाऱ्या निवडणूका कोणत्याही लोकशाही शासन व्यवस्थेच्या सफलतेचे एक मुख्य मापदंड आहे.

2017 च्या ऑक्टोबर महिन्यात भारतीय निवडणूका आयोगाने निवडणुक आयोग एक देश - एक निवडणूका हे धोरण यशस्वीपणे राबवण्यासाठी सक्षम असल्याचे सांगितले. निवडणूक आयोगाची ही भुमिका निवडणूक आयोगातील सुधारणा दर्शविते का ? भारतीय लोकशाहीला बदलाच्या दिशेने घेवूनजावू इच्छिते ? का निवडणूका आयोग राजकीय पक्ष व नेत्यांच्या हातात हात घालून बोलतो असे अनेक अर्थ स्पष्ट करते. निवडणूक आयोगाच्या या भुमिकेवर दोन दिवस भारतीय इलेक्ट्रॉनिक व प्रिंट मिडियात सखोल चिंतन झाले. वर्तमानपत्राचे रकानेच्या रकाने, संपादकीय लिखान याविषयावर करण्यात आले.

प्रस्तुत लेखात निवडणूका आयोगाने अशी भुमिका जाहिर करणे म्हणजे त्यात कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्याची तयारी असल्याचे दर्शविणे प्रमाण मानून लेखन करण्यात आले. तसेच निडणूक आयोगाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. एका राज्याच्या निवडणूका आयोग अनेक टप्यात घेते. या ठिकाणी निवडणूक आयोग संपुर्ण भारताच्या लोकसभा व विधानसभा निवडणूका एकदाच घेण्याची भाषा करते. यामुळे निवडणूक यंत्रणेला कोणत्या समस्या भेडसावतील हे सांगुन निवडणूक यंत्रणेतील दोष सांगण्याच्या हेतूने हा लेख लिहिला. निवडणूका यंत्रणा सदोष आहे हे गृहित मानूनच लेख लिहिला आहे. परंतु या सदोष यंत्रणेतील सर्वच दोष घालवण्याच्या मानसिकतेत निवडणूक आयोग आहे. फक्त त्यास राजकीय पक्ष सकारात्मक साद देत नाहीत. तरी आजपर्यंत निवडणूक प्रकियेत झालेल्या सुधारणावर चिंतन करण्याच्या मानसिकतेतून हा लेख लिहिला आहे.

19 जानेवारी 2018 रोजी झी न्युज चॅनल्सला भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीनी दिलेल्या मुलाखतीत सुधीर चौधरी यांनी एक देश एक निवडणूका या विषयी विचारलेल्या प्रश्नावर सविस्तरपणे उत्तर दिले. स्वातंत्र्यानंतर झालेली 1952, 1962,1967 मध्ये लोकसभा व विधानसभेच्या निवडणूका एकत्रितच झाल्या. भविष्यातही या निवडणूकासह स्थानिक स्वराज्य संस्थातील संपूर्ण देशाच्या निवडणूका एकत्रित झाल्यातर देशाचे 80 हजार करोड रुपये वाचतील असा प्राथमिक अंदाजे आहे. या निवडणूका एकत्रित व्हव्यात म्हणून 20 व 21 जानेवारीला मुंबई येथे One Nation One Election या विषयावर सेमिनार झाला.

2009 च्या लोकसभा निवडणूकीत साधारणपणे 09 ते 11 हजार करोड रुपये शासनाचा खर्च झाला. 2014 च्या लोकसीाा निवडणूकीत तो 3870 करोड रुपयावर गेला. याशिवाय प्रत्येक उमेदवाराकडून होणारा खर्च वेगळाच 2014 पासून देशात झालेल्या विधानसभा निवडणूकावर साधारपणे 4570 करोड रुपये खर्च झाला. शासनाला निवडणूकीसाठी एका बुथवर 11 कर्मचारी नियुक्त करावे लागतात. देशात 930000/- हजार पोलिंग बुथ आहेत. 187306 पोलिंग युनिट आहेत. या निवडणूकीत 55 लाख कर्मचारी काम करतात.

एक देश एक निवडणूकमुळे प्रशासनावरील ताण कमी होईल. देशाचे शासन चालवण्याकडे अधिक लक्ष देता येईल. काळया पैश्यावरील नियंत्रण येईल. गुन्हेगारी प्रवृत्ती नियंत्रणात येईल. राष्ट्र बांधणी व राष्ट्रहिताचे कार्य होईल. यासाठी शासनाला घटना दुरुस्ती करावी लागेल.

भारतात निवडणूका ही एक राजकीय घटनाक्रम नाही. त्याचे सामाजिक,सांस्कृतिक व आर्थिक अंग आहेत. निवडणूका

बदलाच्या वाहक असतात. प्रत्येक निवडणूकीत सामाजिक-आर्थिक, राजकीय शक्तीचे संघटन, समन्वय आणि परिवर्तनाचे नवे प्रारुप उदयास येते. भारतीय राजकारणात राजकीय पक्ष.राजकीय समुह, दबाव गट, हितसंबंधी गट यांचे स्वरुप नेहमीच अनिश्चित असते. त्याचा अंदाज आपणास लावता येत नाही. लावला तर तो खरा ठरत नाही. भारतीय राजकारणातील राजकीय पक्षाचे वर्तन अपेक्षित मापदंडानुसार खरे ठरत नाही. मागील सात दशकाचा प्रवास पाहता भारतात लोकशाही संस्था व प्रक्रियांचा विकास यशस्वीपणे झाला. या काळात भारतीय लोकशाहीसमोर अनेक आव्हाने आली. तरी भारतीय लोकशाही नष्ट झाली नाही, थांबली नाही, खंडित झाली नाही.

ती निजतेच्या अधिकारापर्यंत अखंडितपणे प्रवाहीत आहे. पुढेही राहिल. उलट ती अधिक सुदृढ व सक्षम बनेल. संपुर्ण जगाला मार्गदर्शन देण्याची ताकत तिच्यात येईल. ती आपणच आपल्या वर्तनातून आणू. कारण लोकशाही भारतीयांना नुसती शासनप्रणाली म्हणून स्विकारली नाही तरी ती जीवनप्रणाली म्हणून स्विकारली. भारतीय जगातील सर्वात मोठया लोकशाहीचा देश आहे. या विशाल लोकशाहीत एक देश-एक निवडणूका कितपत शक्य आहेत.? यावर विचार करु भारत जगातील लोकसंख्येच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे.

भारताची लोकसंख्या 134 करोड आहे. समजा 2018 मध्ये एक देश- एक निवडणूकीचे धोरण ठरले, तर त्या घेण्यासाठी शासनाने निवडणूक आयोगाला तेवढया प्रमाणात आर्थिक निधी पुरवावा लागेल. वर्तमान भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करता शासन ते करेल ही वारंवार होणाऱ्या निवडणूका-मुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीपेक्षा एकदाच निवडणूका घेण्यावर केलेला खर्च योग्य ठरेल. या निवडणूका एकदाच घेण्यासाठी मोठया प्रमाणात कर्मचारी वर्ग लागतो जो या देशातील केंद्रीय कर्मचारी,

राज्य कर्मचारी, निम शासकीय कर्मचारी, शासकीय निधीचा फायदा घेवून उपक्रम व संस्था चालवणारे, शासकीय निधीतून आपला उदर्रानर्वाह भागवणारे सर्वच जणांना या प्रक्रियेत सहभागी करुन घ्यावे लागेल. राष्ट्रीय कार्य म्हणून ते सर्वचजण हे करतील. या निवडणूकांना राष्ट्रीय उत्सवाचे स्वरुप येईल. अशा प्रकारच्या निवडणूकात मतदार जाणीव जागृतीच्या अभियानात NGO महाविद्यालयीन युवक युवतीचा संघ, राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना ईत्यादीना या अभियानात सहभागी होण्याची संधी मिळेल. याचा अर्थ या निवडणूका काही संधी व काही आव्हाने निर्माण करतील एक-देश -एक निवडणूका हा उपक्रम राबवताना खरा प्रश्न निर्माण होईल.

तो सुरक्षा यंत्रणेवरया निर्णयाची अंमलबजावणी करण्यापुर्वी शासनास सुरक्षा यंत्रणेचा आढावा घ्यावा लागेल. भारतीय सीमेवर पाकिस्तान व चीनचा धोका वाढत आहे. अशा स्थितीत या निवडणूकात अर्धसैनिक बल, मिल्ट्री याना पाचारण करणे कितपत योग्य होईल. या निवडणूका घेण्यासाठी शासनाला कायदा व सुव्यवस्थेतील कर्मचारी, भरती मोठया प्रमाणात करावी लागेल देशातील प्रत्येक घटकापर्यंत या निवडणूका घेण्याने होणारे फायदे समजून सांगावे लागतील. एक देश एक निवडणूका ही फार चांगली प्रक्रिया आहे. यात राजकारण न करता सर्वच सत्ताधारी व विरोधी राजकीय पक्षानी त्यास पाठिंबा दयावा. या निवडणूकामुळे निवडणूकीतील पारदर्शकता राहील का ? या सर्वाचा अंदाज शासन, निवडणूक आयोगाने घ्यावा. अन्यथा GST व नोंदाबंदीसारखी अवस्था होईल. जे आजपर्यंत या देशाच्या निवडणूका व लोकशाहीच्या इतिहासात झाले नाही ते होईल म्हणजे संपूर्ण निवडणुक यंत्रणाच संशयाच्या भोवऱ्यात सापडेल. जे लोकशाहीच्या भवितव्यासाठी घातक आहे. या निवडणूका घेताना शासनाने प्रसार माध्यमांची मदत घ्यावी. या निवडणूका यशस्वी करणे ही निवडणूक आयोगासोबतचे या देशातील प्रत्येक नागरीकाची जबावदारी आहे. त्यामुळे त्यातील प्रत्येकाचा सक्रिय सहभाग आपणास वाढवावा लागेल.

एक देश-एक निवडणूकाच्या संदर्भातील धोका, शासनाने घ्यावयाची खबरदारी व जनतेची जबावदारी वरिलप्रमाणे सांगता येईल. एक देश- एक निवडणूका यांचा देशाला काय फायदा आहे. ? हा ही प्रश्न या निमित्ताने निर्माण होतो. सध्या देशात भारतीय जनता पक्ष विशेषतः नरेंद्र मोदीच्या लोकप्रियतेचे वारे आहे. या लोकप्रियतेचा फायदा घेवून विधानसभा व लोकसभेत एकाच पक्षाची सत्ता यावी यासाठी हे सरकार हा निर्णय घेत आहे का ? कदाचित हा हेतू असेल तर भारतीय जनात त्याना याच निर्णयातून येणाऱ्या मतपेटीतून उत्तर देईल. परंतु या निर्णयाकडे एक भारतीय नागरीक म्हणून तटस्थपणे पाहणे गरजेचे आहे. एक देश-एक निवडणूकामुळे भारतीय शासन-प्रशासनाची वांरवारच्या आचारसंहितेच्या जाचातून सुटका होईल. विकास कामाला गती येईल. वारंवार होणाऱ्या निवडणूकामुळे ग्रामीण व शहरी भागाला नेहमीच निवडणूकांचे स्वरुप असते. ज्यामुळे हिंसाचार व गुन्हेगारी प्रवृत्ती निपजत असते ती बंद होईल.

पोलिस प्रशासनाच्या कामाचा ताण कमी होईल. निवडणूक आयोगाला पाच वर्षात निवडणूक सुधारणाकडे लक्ष देता येईल. विकास कामावरचा निधी विकास कामावर खर्च होईल. वारंवार निवडणूकामुळे युवा शक्ती नेहमीच निवडणूकीच्या कामात गुंतते. ग्रामीण व शहरी भागातील राजकीय नेते या युवा शक्तीचा वापर स्वतःच्या राजकीय स्वार्थापुरतीसाठी करतात. ते यामुळे होणार नाही. युवक स्वतःच्या करिअरकडे लक्ष देतील. राजकीय शत्रुत्वाचे प्रमाण वाढणार नाही. राजकीय पक्षाची शक्ती मग ते सत्ताधारी असो की विरोधक निवडणूकाच्या प्रचारातच जास्त खर्ची न होता. निवडणूकात लोकांना दिलेल्या आश्वासनपुर्ण करण्यावर अधिक लक्ष केंद्रीत करता येईल. यामुळे भ्रष्टाचार कमी होईल. प्रशासनातील दैनंदिन कामे खोळंबणार नाहीत. प्रशासनातील दफ्तर दिरंगाई कमी होईल. कर्मचाऱ्यांची कार्यालयीन उपस्थिती वाढेल. सर्व कामे वेळेवर होतील. भारतीय अर्थव्यवस्थेवरचा अतिरिक्त ताण कमी होईल. देशाचा जीडीपी सुधारेल. विकासाच्या योजना व प्रकल्पाचे काम मार्गी लागेल कारण निवडणूकामुळे ते काम आचारसंहितेच्या कचाटयात सापडते यामुळे देशातील निवडणूक यंत्रणेला एक नवी व स्वतंत्र ओळख निर्माण होईल. राष्ट्रीय संपत्तीची बचत होईल. यामुळे संपुर्ण देशातील मतदारांचे एकाच वेळी मतदान करुन घेणे हा देखील वैश्वीक रेकॉर्ड होईल. या निवडणूकामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची एक नवी ओळख व दबदबा वाढेल. चलनांचे डुप्लीकेटपणाकरुन निवडणूकीच्या काळात त्याचा सुळसुळाट करणाऱ्यावर आळा येईल. दारुच्या व्यवसायावर त्याचा नकारात्मक परिणाम होईल. निवडणूकीच्या काळात विषारी दारु पिवून लोकांचे बळी जातात त्याचे प्रमाण कमी होईल. निवडणूका आल्या की माता - भगिनी चिंताग्रस्त होतात. त्यांची चिंता कमी होईल. वारंवार निवडणूकीत लोक व्यस्त असायचे. त्यांची व्यथा कमी होईल. त्यातील बरेच हात निर्मितीच्या क्षेत्रात गुंततील. ग्रामीण भागात शेतीच्या कामाकडे पुरुष मंडळीचे लक्ष लागेल. वारंवार निवडणूका म्हणजे लोकांना वाई-बाटलीचे आकर्षण दाखवून, त्यांची मती भ्रष्ट करुन स्वतःची सत्ता टिकवण्याचा जो प्रभाव होत होता त्यांस काहीप्रमाणात आळा बसेल. याचा अर्थ एक देश - एक निवडणूक अनेक अनर्थावर योग्य रामबाण औषध म्हणावेसे वाटते.

यानंतर या लेखचा दुसरा भाग म्हणणजेच निवडणूक प्रक्रियेतील दोषावर प्रकाश टाकणे होय. 2014 साली लोकसभेची 16 वी निवडणूक संपन्न झाली. यासोबतच अनेक राज्याच्या विधानसभा निवडणूका याचवर्षी झाल्या. या प्रत्येक निवडणूकातून भारतीय लोकशाहीची पाळेमुळे मजबूत होत आहेत. भारतीय राज्यघटनेतील कलम 324 ते 329 मध्ये निवडणूक आयोगाची रचना अधिकार, स्थापना याबाबत विस्ताराने चर्चा करण्यात आली. भारताने प्रांरभापासूनच निवडणूक प्रकियेत गरज व कलमानानुसार अनेक नवीन साधनांचा व सुधारणाचा स्विकार केला. तरी भारतीय निवडणूक यंत्रणेत अनेक दोष आहेत. ते पुढीलप्रमाणे .

वर्तमान भारतीय निवडणूकीत अधिक मतदान घेणाराच विजयी घोषीत हातो. परंतु या बहुमताच्या प्रथेचे आकडेवारीसह विश्लेषण करता विदोक चित्र समोर येते. ते म्हणजे एका निवडणूकीत अधिक उमेदवार असतील तर त्या निवडणूकीत विजयी उमेदवारास मिळालेली मते पराभुत उमेदवाराच्या एकत्रीत मतदानापेक्षा कितीतरी पटीने कमी असतात. अशीच स्थिती सत्ताधीश राजकीय पक्षाला एकुण मिळालेल्या मताची असते. ज्या राजकीय पक्षाला 50% पेक्षा जास्त लोकांनी नाकारले तोच राजकीय पक्षा बहुमताचा आकडा पार करतो आणि सत्ता मिळवतो हा प्रकार बंद होणे गरजेचे आहे.

अलिकडील निवडणूका म्हणजेच पैसा असे समीकरण बनले. या समीकरणात विकसित देशही सहभागी आहेत, अमेरिका, इंग्लंड, रशियासह अनेक युरोपीयन राष्ट्रांत निवडणूकीमधील पैसाचा वापर व प्रमाण वाढले आहे. स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे एका भाषणात म्हटले की, मला एका खासदारकीची निवडणूक जिंकण्यासाठी आठ (08) कोटी रुपये खर्च करावे लागतात. यावरुन आपणास निवडणूकीतील पैसाचा वाढता वापर लक्षात येतो. निवडणूक आयोगाने निवडणूकीत उमेदवाराच्या खर्चाची मर्यादा निश्चित केली. परंतु त्या मर्यादेच्या कितीतरी पटीने जास्त उमेदवार खर्च करतो. उमेदवार पैसा देवूनच मतदान विकत घेतो. निवडणूकात परकीय पैसा व काळया पैसाचा वापर वाढत आहे. ज्या व्यक्तिच्या हातात आर्थिक तिजोरीच्या चाव्या असतात तोच व्यक्ति राजकीय सत्तेच्या प्रवेशव्दारातून खुर्ची पर्यंत पोहचू शकतो. खुर्ची प्राप्तीनंतर पुन्हा पैसा कमवायचेच काम होते. 2014 च्या लोकसभा व विधानसभा निवडणूकात अनेक धनाढयांनी आपली संपुर्ण ताकत भारतीय जनता पक्षाच्या मागे लावून त्यास विजयी केले. अमेरिकेच्या राष्ट्रध्यक्ष निवडणूकीत डोनाल्ड ट्रम्पसारखा बलाढय व्यापारीच राष्ट्रध्याक्षाची निवडणूक जिंकतो. निवडणूका राजकारण व पैसा यांचे अतुट नाते आहे.

या नात्याबद्दल बुध्दिवादी चर्चा करतात. समाजसेवक त्याविरुध्द लोक आंदोलन करुन लोकपालाची मागणी त्यांना करतात. परंतु याच मागणी नेते मुख्यमंत्री पदाची खुर्ची मिळतेच ते अर्थप्रातीच्या दिशेन जाताना दिसतात.

भारतात राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवर अनेक राजकीय पक्षाचा उदय झाला. राजकीय पक्षांचा सुळसुळाट हे भारतीय लोकशाहीचे लक्षण बनले. या सर्व राजकीय पक्षाकडून पक्षाच्या जाहिरनाम्यात, निवडणूक प्रचारात, बैठकीत लोकशाही मुल्य, संस्कृती यांची चर्चा होते. परंतु वास्तवतेत प्रत्येक राजकीय पक्षांतर्गत हुकुमशाही व घराणेशाही आणि व्यक्तिपुजा आहे. पक्षीय निवडणूकात अनियमितता असते. पक्षाच्या जमा-खर्चाचा आर्थिक हिशोब नसतो. प्रत्येक पक्षात काही समाधानी, अल्पसमाधानी व असमाधानी कर्यकर्त्याचा गट असतो. निवडणूकीत पक्षामार्फत आपणास उमेदवारी मिळविण्यासाठी असंवैधानिक मार्गाचा वापर उमेदवाराकडून होतो. बेरच उमेदवार आपल्या पक्षाने तिकीट नाही दिले तर अपक्ष किंवा दुसऱ्या पक्षाकडून तिकीट घेवून निवडणूका लढवतात, तिकीट मिळवण्यासाठी आरोप-प्रत्यारोप होतात. जात, धर्म , पैसा, प्रदेश ईत्यादी समीकरणाचा वापर होतो. निवडणूका दरम्यान उमेदवार आणि राजकीय पक्षाचे ध्येय धोरण चारित्र्य, विचाराधारा किंवा कामकाजाबाबत त्यांचे भविष्याचे नियोजन पाहून मतदान करण्याचा विचार करणारा मतदार फार कमी आहे. या तुलनेत उमेदवाराची जात, धर्म, मनुष्यबळ, वाक्चातुर्य, खोटी आश्वासने, पैसा, दारु,मटन,चिकनच्या पार्टया आणि राजकीय पक्षाची या सर्वावरील भुमिका लक्षात घेवून मतदार मतदान करताना आढळतो. याच मुदयाला अनुसरुन प्रसार माध्यमे आपल्या बातम्या रंगवतात. निवडणूक जिंकण्यासाठी सर्व काही या शिर्षकाचे उदय निरगुडकर यांनी एक पुस्तक लिहिले. ज्यात त्यांनी या सर्व मार्गावर प्रकाश टाकला. वर्तमान राष्ट्रीय व राज्य राजकारणात गुन्हेगारी पार्श्वभुमीच्या व्यक्तीला अधिक प्राधान्य दिले जाते. निवडणूकीतील हिंसा, शारिरीक बळाचा वापर सर्व राजकीय पक्षामार्फत गुन्हेगारांना देण्यात येणारे प्राधान्य, ब्लॅकमेलिंग,अपहरण, मारहान, बोगस मतदान, मतदान मशीन पळवणे, धमकी देणे ई. असंवैधानिक मार्गाचा राजकारणात सुळसुळाट होत आहे. निवडणूकीत हिंसेचा दबदबा वाढत आहे.

भारतात बहुपक्षीय पध्दत आहे. पयामुळे पक्ष काढण्यास बंधन नाही. त्यामुळे त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पक्षांतर बंदी कायदयाने पक्षांतराची प्रक्रिया अधिक गतिमान झाली. ऐन-केन प्रकारे आपणास सत्तेची खुर्ची मिळावी किंवा त्यांच्या जवळपास रहाता यावे म्हणून अनेक राजकीय पक्ष निर्माण होता. स्वाभिमान दुखावला, व्यक्तिमत्वास संधी नाही, मोकळा श्वास घेता येत नाही, माझ्या कार्यकर्त्याला न्याय मिळत नाही, मला नेतृत्वाची संधी मिळत नाही. माझी कोंडी केली जाते असे अनेक कारणे सांगून जनतेच्या डोळयात धुळ फेकुन त्यांची सहानुभूती निवडणूकात मिळवून स्वतःची राजकीय खेळी व राजकारण जिवंत ठेवण्यासाठी स्वतंत्र स्वतंत्र राजकीय पक्ष काढण्याचे प्रयत्न अनेक नेत्याकडून होतात. बरेच नेते प्रत्येक निवडणूकीत पक्षांतर करतात. फक्त मंत्रीपद मिळवण्यासाठी यामुळे लोकशाहीचा संवैधानिक आधार डगमगतो. लोकशाहीची थट्टा तिच्याच नियमाला हाताशी धरुन हे राजकीय पक्ष कशी करतात याचे उत्तर म्हणजे पक्षांतर किंवा स्वतंत्र राजकीय पक्षाची निर्मिती करणे होय.

निवडणूकीमुळे प्रत्येकाला आपले राजकीय अधिकार उपभोगण्याची संधी मिळते. निवडणूका राजकीय स्वातंत्र्याचा अविष्कार होय. लोकशाहीने नागरीकांना दिलेली निवडणूकाही एक नामी संधी आहे. परंतु या संधीचा वापर लोककल्याण व राष्ट्र हितासाठी न करता स्वतःची राजकीय जमात विकसित करण्यासाठी केला जातो. अलिकडील निवडणूकात अपक्ष उमेदवारांची संख्या वाढत आहे. त्यामुळे मतपत्रीकांचा आकार वाढतो. त्यामुळे मतपेटया किंवा मशिनीची संख्या व आकारही वाढवावा लागतो. या वाढत्या अपक्षामुळे राजकीय गणीत बिघडतात अपक्ष लोकशाहीतील एक थट्टा झाली. निवडणूकी अगोदर अपक्ष नंतर पक्ष तेही खुर्चीसाठी हा संधीसाधु व स्वार्थीपणा निवडणूक यंत्रणेसमोरील फार मोठा अडथळा आहे. निवडणूकीपुढील आणखी एक अडथळा म्हणजे मतदान यांदयाची अपुर्णतः. निर्धारीत वयोमर्यादा पुर्ण केलेल्या व्यक्तीनी मतदार म्हणून नाव नोंदवावे यासाठी शासन अभियान चालवते. शासनाच्या या अभियानास जनता प्रतिसाद देते. परंतु या प्रतिसादाप्रमाणे मतदार यादी बनत नाही. त्यात अनेक दोष असतात. उदा. चुकीचे नाव, चुकीचा पत्ता, नाव एक आणि फोटो दुसराच, नाव स्त्रीचे फोटो पुरुषाच्या फोटो नसलेले नाव अशा अर्धवट यादया निवडणूक आयोग जाहिर करत. कधी कधी तर ज्या उमेदवाराने खरंच 18 वर्ष पुर्ण केली त्याचेच नाव मतदार यादीत नसते. मयत व्यक्तीचे नाव मतदार यादीत असते. जिवंत व्यक्तीचे नसते. मतदार यादीतील पत्ता चुकीचा असतो. या सर्व चुका व दोष या यंत्रणेत काम करणाऱ्या कामगारांचा किंवा अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा, तंत्रज्ञानाच्या ज्ञानाचा

अभाव. तांत्रिक दोष तसेच या संदर्भात निवडणूक आयोगाने सुचना व माहिती देवूनही त्याकडे लोकांनी केलेले दुर्लक्ष होय. या मतदार यादीतील सर्व दोषामुळे अनेक नागरीक मतदान करण्यापासून वंचित होतात.

निवडणूका पारदर्शक, दबावरहित व लोकशाही तत्वाचे पालन करणाऱ्या व्हाव्यात. परंतु ही संपुर्ण यंत्रणाच हाताळणारे अधिकारी व कर्मचाऱ्यावर दबाव टाकणे हा एक महत्वपुर्ण दोष या यंत्रणेतील आहे. निवडणूक यंत्रणेवर राजकीय आर्थिक व व्यापारी आणि गुन्हेगारी क्षेत्रातून अनेक दबाव येतात. प्रसंगी या दबावात बदली, बढती, जिवे मारणे, कुटूंबातील सदस्यांना त्रास देणे, अपहरण करण्यापर्यंतचे प्रकार घडतात, तसेच निवडणूक अधिकाऱ्याच्या कामात अडथळे आणणे त्यांना त्याच्या मर्जीनुसार काम न करु देणे या सर्व दबावाला बळी पडून ही यंत्रणा मतदार यादीतून मतदारांचे नाव कमी करते. बऱ्याचदा लोकप्रतिनिधीचेच नाव मतदार यादीतून वगळले जाते. ज्यामुळे त्यांना निवडणूक लढवता येणार नाही.

ग्रामपंचायतीपासून ते लोकसभेच्या निवडणूकीपर्यंत अपक्ष उमेदवाराची संख्या अधिक वाढत आहे. लोकशाहीत अपक्ष निवडणूक लढवणे राजकीय अधिकार व स्वातंत्र्याच्या एक भाग आहे. परंतु याचा वापर अधिक प्रमाणात निवडणूकीच्या काळात होणे निवडणूका आणि लोकशाहीसाठी घातक आहे. राजकीय पक्षांचे सर्व लक्ष सत्ता प्राप्तीकडे

असते. त्यासाठी आपण कोणत्या धोरणाचा कार्यक्रमाचा अवलंब करतो याकडे राजकीय पक्ष लक्ष देत नाहीत. जनतेला आकर्षित करण्यासाठी राजकीय पक्ष अनेक कार्यक्रम बनवत. सर्वच राजकीय पक्ष लोकांना अनेक आश्वासने देतात. गरीबी हटाव पासून अच्छे दिन पर्यतचा इतिहास आहे. प्रचारादरम्यान परस्परविरुध्द आरोप-प्रत्यारोप केले जातात. इतरांना कनिष्ठ, कुमकुवत, कामचोर ठरवून आपण कसे श्रेष्ठ, चांगले आहोत हे दाखवण्याचा प्रयत्न होतो. या प्रयत्नात आपण लोकशाहीचा गळा कसा दाबत आहेत. याकडे राजकीय पक्ष जाणीवपुर्वक दुर्लक्ष करतात.

निवडणूका लोकशाहीचे प्रतीक आहे. परंतु सातत्याने होणाऱ्या निवडणूका लोकशाहीची स्थिरता व विकास प्रक्रियेला घातक असतात. यासाठी सत्ताधारी व विरोधी पक्षांनी आपापसात समन्वय राखणे गरजेचे आहे. निवडणूक प्रणालीत सुधारणा हा बऱ्याच दोषावरील रामबाण उपाय आहे. या उपायाला व्यवहारात आणून त्यावर अंमलबजावणी करण्यासाठी मुलभूत व संस्थात्मक बदल आवश्यक आहेत. आजपर्यंतचा निवडणूक सुधारणेचा इतिहास समजून घेता आपणास खालील सुधारणा झाल्याचे व प्रस्तावित असल्याचे दिसून येते.

1) निवडणूकीतील अपक्ष उमेदवारावर बंदी आणावी.
2) प्रत्येक राजकीय पक्षाने निश्चित प्रमाणात निवडणूकात महिलांना उमेदवारी दयावी (लोकसभा
व विधानसभात) जेणे करुन राजकारणतील महिलांचा प्रवेश सुकर होईल व सहभागीत्व वाढेल.
3) निवडणूकीच्या निकालास राजकीय पक्षाने सहज स्विकारावे.
4) निवडणूकात उमेदवार निवड प्रकियेवर पक्षाचा अध्यक्ष, प्रमुख व वरिष्ठ नेत्यांचा प्रभाव असतो.
ज्यांना स्थानिक राजकारण व प्रस्थितीचा सर्वच अंगाने अभ्यास नसतो. त्यामुळे योग्य व्यक्तिलाच
उमेदवारी मिळण्याची शक्यता नसते. योग्य उमेदवाराला निवडणूकीत उमेदवारी मिळावी यासाठी
केंद्राचा हस्तक्षेप कमी करुन स्थानिक नेत्यांना उमेदवार निवडीचे स्वातंत्र्य दयावे.
5) मतदार यादीला बनवण्याचे काम सदैवच चालू रहावे.
6) मतदान अनिवार्य करावे.
7) मतदानाच्या अनिवार्यतेसाठी शासन व राजकीय पक्षाने प्रयत्न करावे.
8) संवेदनशील मतदान केंद्रावर सुरक्षा कडक ठेवावी.
9) निवडणूक आयोग आणि शासनातील मतभेद विचारविनिययातून सोडवावेत.
10) निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराची अनामत रक्कम वाढवावी ज्यामुळे या प्रति त्याचे गांभिर्य वाढेल.
11) निवडणूकीत विजय मिळावा म्हणून चुकीचे मार्ग स्विकारण्यास दंडीत करणारी यंत्रणा सक्षम व स्वतंत्र असावी.
12) गुन्हेगारी पार्श्वभुमीच्या व्यक्तिला निवडणूक लढवण्याची परवानगी नसावी.
13) सत्ताधारी पक्षाकडून सत्तेचा गैरवापर होवू नये यासाठी कायदयाच्या पातळीवर व्यवस्था करावी
14) वाढत्या महागाईचा विचार करुन निवडणूक खर्चाची मर्यादा वाढवावी.
15) राजकीय पक्ष ज्या मार्गाने पैसा मिळवतात तो हयांनी प्रकाशित करावा.

16) निवडणूकीच्या खर्चाचा हिशोब ज्या उमेदवाराने चुकीच्या मार्गाने दाखल केला व ते सिध्द झाल्यास त्यास अजन्म निवडणूक लढवता येवू नये.

17) सर्वच प्रकारच्या निवडणूक लढवण्याची एकच निश्चित वयोमर्यादा असावी.

18) निवडणूक निहाय निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारासाठी शैक्षणिक योग्यता असावी.

भारतात आजपर्यंत निवडणूक प्रणालीत सुधारणा व्हावी म्हणून के संथानम समित्या नेमल्या. तसेच वारंवार अनेक राजकारणी,राजकीय पक्ष, समाजसुधारक, निवडणूक आयुक्त, प्रसार माध्यम ईत्यादीच्या प्रतिनिधीनी निवडणूक सुधारणाबाबत अनेक मत मांडले. परंतु शासन त्यातील आपल्या सोईच्या मताकडेच लक्ष देते. त्यातील एक मत म्हणजे एंक देश एक निवडणूका होय. याबाबतीत सर्वच राजकीय पक्षांनी सारासार, सद्सद्विवेकबुध्दीने राष्ट्रीय हिताला समोर ठेवून विचार करावा.

भविष्यात काही चांगले होणार असेल तर वर्तमानात काही कठोर निर्णय घेवून त्याच्या अंमलबजावणीसाठी पुढचे पाऊल टाकण्यातच शहाणपणा असतो. असा शहाणपणा या देशाच्या निवडणूक प्रक्रिया व राजकीय व्यवस्थेशी संबंधित सर्वच लोकांत विकसित होवून त्याची देवाण घेवाण व्हावी. मानवी वर्तनावर नियंत्रण ठेवून सुधारणा करण्याचा बसवेश्वरी मार्ग अनुसरावा.

भारताच्या निवडणूक व्यवस्थेतील सर्व दोष नाहिसे करण्यासाठी वरील सुधारणा करणे अपेक्षीत आहे. यातील काही सुधारणा झाल्या आहेत. तर काही सुधारणा कराव्या लागतील. या सर्व दोषांना नाहीसे करण्यासाठी एक देश एक निवडणूक हा सर्वोत्तम पर्याय आहे. परंतु या पर्यायाला व्यवहारात आणण्यासाठी शासनासमोर अनेक आव्हाने आहेत. उदा. सर्व राजकीय पक्षाचा पाठींबा मिळविणे तसेच राज्यघटनेतील कलम 83 (एकत्रित निवडणूका घेण्यासाठी), कलम 85 (संसदेच्या अधिवेशनाला स्थगिती देण्यासंदर्भात ), कलम 172 (विधानसभेचे अधिवेशन स्थगित करणे), कलम 174 (विधान सभेचा कालावधी संपुष्टात आणणे), कलम 356 (राष्ट्रपती राजवट लागू करणे). या सर्व कलमात दुरुस्त्या कराव्यात लागतील.

**संदर्भ :**

1) दैनिक लोकसत्ता दि. 23 जानेवारी 2018 चा अंक
2) निवडणूका मार्गदर्शिका - डॉ. भालबा विभूते- मनोविकास प्रकाश-मुंबई-2008
3) लोकशाहीचे बदलते स्वरुप आणि निवडणूकांचे राजकारण (लोकसभा निवडणूक 2014) डॉ. अलका देशमुख
4) भारत में निर्वाचन व्यवस्था- चुनौतियाँ एवंम सभांवनाए - आर एस. लाढा- ABD पब्लिशर्स जयपूर
5) भारतीय संविधान व भारतीय राजकारण (महाराष्ट्राचा विशेष संदर्भासह) - तुकाराम जाधव - महेश शिरापूकर-युनिक अकॅडमी, पुणे-2012
6) लोकशाही आणि निवडणूक प्रक्रिया - डॉ. राजशेखर सोलापुरे.अरुणा प्रकाशन लातूर.
7) दैनिक महाराष्ट्र टाइम्स दि. 05.02.2018 चा अंक

Principal
A.V.Education Society
Degloor College Degloor